# विपश्यना

साधक

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. 30/-
आजीवन शुल्क रु. 500/-

बुद्धवर्ष २५५८, आषाढ पौर्णिमा, १२ जुलै, २०१४ वर्ष १ अंक ३

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

को नु हासो किमानन्दो, निच्चं पज्जलिते सति।
अन्धकारेन ओनद्धा, पदीपं न गवेसथ॥

*धम्मपद- १४६, जरावग्गो.*

जेथे प्रतिक्षण (सर्व काही) जळतच आहे, तेथे कसले हसू? कसला आनंद? (कसला आमोद? कसला प्रमोद?) अरे, (अविद्यारुपी) अंधकाराने घेरलेल्या (भोळ्या लोकांनो) तुम्ही (ज्ञानरुपी) प्रदीप का शोधत नाही?

## धर्मचक्र प्रवर्तन

### (पूज्य गुरुदेवांद्वारे लिहिलेले एक धर्म पत्र)

*रंगून, दि. ९/१५-७-१९६८*

प्रिय शंकर ! सीता ! राधे ! विमला !

धर्माचे तत्व समजणारे बना !

आज आषाढ पौर्णिमेचे पावन पर्व आहे. वैशाख पौर्णिमेसारखाच आमच्यासाठी हा सुद्धा अत्यंत महत्वपूर्ण दिवस आहे आणि त्याच प्रकारे त्रिविध पवित्रही. ज्या प्रकारे वैशाख पौर्णिमेच्या दिवशी बोधिसत्वांनी जन्म घेतला, ह्याच दिवशी त्यांना सम्यक संबोधी प्राप्त झाली आणि ह्याच दिवशी सम्यक संबुद्धांने महापरिनिर्वाण प्राप्त केले. त्याच प्रकारे आजच्या दिवशीच बोधिसत्व तुषित देवलोकातून च्यूत होऊन महामायेच्या गर्भात स्थित झाले (जन्माच्या दहा महिन्यापूर्वी) आणि आजच्याच दिवशी त्यांनी घर त्यागून महाभिनिष्क्रमण केले व आजच्याच दिवशी सम्यक संबोधी प्राप्त केल्यानंतर प्रथम धर्मोपदेश देऊन अनुत्तर धर्मचक्र प्रवर्तन केले. तिन्ही बाबी खालील प्रकारे अत्यंत महत्वपूर्ण झाल्या.

### १) नवीन जीवनाचा प्रतिसंधी दिवस

जन्म ग्रहण करण्यासारखेच प्रतिसंधी ग्रहण करणे, म्हणजे गर्भात स्थित होणे अत्यंत महत्वपूर्ण आहे. नाम व रूप, म्हणजे शरीर व चित्ताच्या पारस्परिक संयोगाद्वारे जे जीवन प्रवाहित होते, ते ह्या दोघांच्या उच्छेदनाद्वारे समाप्त होते. ह्यालाच च्यूति म्हणतात, मृत्यू म्हणतात. चित्त संतती काया संततीपासून विभक्त होऊन वेगळी होते. ह्यानंतर निष्प्राण शरीर विघटित होऊन चार महाभूतात विलीन होते, परंतु चित्त संतती विघटित होत नाही. ती ताबडतोब एखाद्या अन्य 'रूप' म्हणजे 'कायास्कंधा'शी जाऊन जुळते. ह्यालाच प्रतिसंधी म्हणतात, गर्भधारणा म्हणतात. पुरूष व स्त्रिच्या वीर्य आणि रजाच्या संमिश्रणाने त्याक्षणी जो कलल (भ्रूणाचा प्रारंभिक गोळा) तयार होतो, चित्त संतती त्याच रूप बिंदूला जाऊन जुळते, हीच नवीन जीवनाची प्रतिसंधी आहे. ह्याचा अर्थ होतो की नवीन जीवन गर्भाच्या रूपात संयुक्त होताच आरंभ होते, जन्म जरी काही महिन्यानंतर झाला तरीही. विनय पिटक (भिक्षूंचे नियम) नुसार कोणीही व्यक्ती वयाच्या २० वर्षापूर्वी भिक्षू बनू शकत नाही. ह्यापूर्वी तो चीवर धारण करतो तर तो श्रामणेर म्हणवला जातो. वीस वर्षाचे वय पूर्ण झाल्यावरच कोणीही उपसंपदा घेऊन भिक्षू जीवनात प्रवेश करू शकतो. ही वीस वर्ष जन्मदिवसापासून मोजली जात नाहीत, तर जन्मापूर्वीच्या १० महिन्या पूर्वीपासून मोजली जातात, म्हणजे गर्भधारणेच्या वेळेपासून मोजली जातात. याचा अर्थ असा आहे की जन्माच्या तुलनेत, गर्भधारणेचे महत्व अधिक आहे.

चित्त-संतती प्रतिक्षण नष्ट होते आणि पुन्हा प्रतिक्षण उत्पन्न होते. तिचे जन्म-मरणचक्र तर प्रतिक्षण चालतच असते. ही चित्त संतती अत्यंत शुद्ध अवस्थेत (ध्यानाच्या बळावर) जर अरूप ब्रह्मलोकात उत्पन्न झाली, तर तिला कोणत्याही रूपखंड अथवा शरीराची आवश्यकता राहात नाही. कारण तेथे केवळ चित्तच चित्त आहे, रूप नाहीच. परंतु बाकी जितक्या ही स्थिती आहेत - रूप ब्रह्मांची, देवांची, मनुष्यांची, पशु-पक्षांची, सरपटणाऱ्या प्राण्यांची, प्रेत, असुर अथवा नरक योनींची, त्या सर्वात ह्या चित्त संततीसाठी रूपाचा आधार असणे नितांत अनिवार्य आहे. चित्त-संतती आधाराविना भटकत फिरू शकत नाही. जर ती प्रेत बनून फिरते, तरीही तिला त्या क्षणी एखाद्या प्रेत योनीच्या सूक्ष्म शरीराशी प्रतिसंधित व्हावे लागते, म्हणजे जुळावे लागते. जे योनिज प्राणी आहेत, त्यांची गर्भात प्रतिसंधी होते. जे अयोनिज प्राणी आहेत, त्यांचे शरीर प्रकट झाल्याबरोबर चित्त-संतती सोबत जुळते. कारण चित्त संततीला रुपाचा आधार ताबडतोब ग्रहण करावा लागतो. हे रूप म्हणजे शरीर मनुष्य, पशू, पक्षी, सरपटणारे प्राणी इत्यादींचे स्थूल म्हणजे भरीव स्वरूपाचे असो अथवा असुर, प्रेत, देव, ब्रह्मांच्या प्रकारचे सूक्ष्म वायव्य असो, परंतु शरीराचे असणे आवश्यक आहेच. चित्त-संतती त्या रूपावचर लोकात भटकत फिरू शकत नाही. शरीरापासून वेगळी झाल्याबरोबर प्रतिसंधी होईलच आणि ह्या प्रतिसंधीचे नावच नवीन जीवन आहे.

ह्या प्रकारे आम्ही पाहातो की आमच्या मान्यतेत एका प्रकाराने तीनदा जन्म होतो. एक जेव्हा गर्भ स्थितीत प्रतिसंधी होते, दुसरा जेव्हा योनिज जन्म होतो आणि तिसरा जेव्हा मोहाच्या आवरणाला ज्ञानाद्वारे तोडून व्यक्ती नवीन जीवन धारण करते. म्हणूनच बोधिसत्व सिद्धार्थांचा जन्म आणि त्यांच्या बुद्धत्व प्राप्तीसमानच त्यांचा हा गर्भ स्थित प्रतिसंधी दिवसही तेवढाच महत्वपूर्ण आहे.

### २) महाभिनिष्क्रमण दिवस

ह्या दिवशी जे महाभिनिष्क्रमण झाले, तेसुद्धा कमी महत्वपूर्ण नाही. ह्याच गृहत्यागात बोधीप्राप्तीचे कारण बीजरूपाने सामावले होते. कोणी सत्व घरात राहून साधारण ज्ञान प्राप्त करू शकेल, परंतु सम्यक संबोधी प्राप्त करूच शकत नाही. भगवानांद्वारे सम्यक संबोधी प्राप्त करणे अथवा ह्या निमित्त घर सोडून वनवासी होणे, केवळ स्वतःच्या मुक्ती वा स्वतःच्या स्वार्थासाठी नसते. जर त्यांना केवळ स्वतःच्याच मुक्तीची इच्छा असती तर चार असंख्येय व एक लाख कल्पांपूर्वी तापस सुमेधच्या रूपाने जेव्हा भगवान दिपंकर बुद्धांचा साक्षात्कार झाला होता, तेव्हाच त्यांच्याकडून विपश्यना शिकून अरहंत पद प्राप्त करून मुक्त झाले असते. परंतु त्या वेळी त्यांच्या मनात धर्म संवेग जागला की ते असंख्य जन्मांपर्यंत अनंत कष्ट-यातनांना सहन करीत क्रमशः दाही पारमितांना परिपूर्ण करून स्वतः सम्यक संबोधी प्राप्त करतील. ह्या प्रकारे केवळ आपलेच नाही

तर असंख्य प्राण्यांचे दुःख दूर करीत त्यांना मुक्ती लाभ करवतील. आणि आता बोधिसत्वाच्या ह्या अंतिम जीवनात सर्व पारमिता परिपूर्ण झाल्यावर, ती वेळ आली जेव्हा त्यांना सम्यक संबोधी प्राप्त होणार होती. केवळ ह्याच हेतूने आपल्याचसाठी नाही तर अनेक प्राण्यांच्या मोक्षासाठी बोधिसत्वाने गृहत्याग केला. त्यामुळे हा महाभिनिष्क्रमणाचा दिवस अत्यंत पावन आहे, कल्याणप्रद आहे.

## ३) बुद्धांचा प्रथम धर्मोपदेश (धर्मचक्र प्रवर्तन)

आजच्याच दिवशी भगवानांनी धर्मचक्र प्रवर्तन केले. पंचवर्गीय भिक्षूंना आपला प्रथम धर्मोपदेश दिला. त्यांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर उदानाच्या रूपाने जे प्रथम आंतरिक उद्‌गार प्रकट केले ते खालील प्रमाणे होते-

*अनेकजाति संसारं सन्धाविस्सं अनिब्बिसं।*
*गहकारकं गवेसन्तो दुक्खा जाति पुनप्पुनं।।*
*गहकारक दिट्ठोसि पुन गेहं न काहसि।*
*सब्बा ते फासुका भग्गा, गहकूटं विसङ्खतं।*
*विसङ्खारगतं चित्तं, तण्हानं खयमज्झगा।।*

*-- (धम्मपद १५३-१५४, जरावग्गो)*

- म्हणजे (ह्या काया-रुपी) घर बनविणाऱ्याच्या शोधात (मी) जन्म-जन्मात (भव) संसरण करीत-राहिलो. परंतु पुन्हा पुन्हा दुःखमय जन्मच हाती पडले. अरे घर बनविणाऱ्या! (आता) तू बघितला गेला आहेस. आता पुन्हा (तू नवीन) घर बनवू शकत नाहीस. तुझ्या साऱ्या कड्या तुटल्या आहेत आणि घराचे छतही नष्ट झाले आहे. चित्त पूर्णपणे संस्काररहित झाले आहे आणि तृष्णांचा क्षय (निर्वाण) प्राप्त झाला आहे.

स्पष्ट आहे की त्यांनी घर बनविणाऱ्याच्या रूपात एखाद्या देव, बह्म अथवा ईश्वराला पाहिले नाही, तर स्वतः आपल्या चित्ताला पाहिले. जे संस्कारांच्या कारणामुळे नवीन-नवीन रूप धारण करते, नवीन-नवीन घर बनवते, वारंवांर जन्म घेते. होय, हे बोल केवळ उदान होते. भगवानांचे उपदेश नव्हते. हे बोल कोणाला संबोधित करून म्हटले गेले नाहीत, तर एकांतात आपोआपच हर्षोल्लासाने भारुन जाऊन म्हटले गेले होते.

ह्याच प्रकारे जे दुसरे आंतरिक उद्‌गार प्रकट केले, ते खालीलप्रमाणे होते -

*यदा हवे पातुभवन्ति धम्मा, आतापिनो झायतो ब्राह्मणस्स।*
*अथस्स कङ्खा वपयन्ति सब्बा, यतो पजानाति सहेतुधम्मं।।*
*यदा हवे पातुभवन्ति धम्मा, आतापिनो झायतो ब्राह्मणस्स।*
*अथस्स कङ्खा वपयन्ति सब्बा, यतो खयं पच्चयानं अवेदी।।*
*यदा हवे पातुभवन्ति धम्मा, आतापिनो झायतो ब्राह्मणस्स।*
*विधूपयं तिट्ठति मारसेनं, सूरियोव ओभासयमन्तलिक्खं।।*

*--(कथावत्थुपाळि २.३२१, कङ्खाकथा)*

- म्हणजे जेव्हा कोणी तपस्वी ब्राह्मण तप साधना करून धर्माचा साक्षात्कार करून घेतो, तेव्हा त्याचे सारे संशय दूर होतात. तो धर्माच्या कारणांना जाणतो. उत्पत्तींच्या कारणांना जाणतो, त्या कारणांचा निरोध जाणतो आणि त्यांचे उन्मूलन जाणतो. ह्या प्रकारे कारणांना जाणून आणि जाणलेल्या कारणांचा निरोध करुन तो तपस्वी ब्राह्मण दुष्ट माराला जिंकून अशा प्रकारे प्रभावान होऊन स्थित होतो, जसा ढगांना विखरुन, दूर करुन खुल्या आकाशात चमकणारा सूर्य. हेही केवळ उदान वचन होते, भगवानांचे उपदेश नव्हते.

मुक्तिसुखात सात सप्ताह पूर्ण झाल्यावर भगवानांच्या मनात असा भाव जागला - 'मी ज्या अनुत्तर धर्माला प्राप्त केले आहे, तो इतका गंभीर आहे, दुर्दर्शनीय आहे, गहन आहे, तर्काने अप्राप्त आहे. ह्या धर्माला ही कामभोगात व मूढतेत रत जनता कशी समजू शकेल ? समजवण्याचा प्रयत्न निरर्थक होईल, कष्टदायक होईल.' विचित्र स्थिती उत्पन्न झाली. प्राण्यांना सत्य धर्माचे दर्शन करवून निर्वाणाकडे घेऊन जाण्याची दुर्दमनीय कामना ठेवणारे बोधिसत्व जेव्हा स्वतः सम्यक संबुद्ध झाले तेव्हा विचार करू लागले - 'ह्या गंभीर धर्माला आपल्यापर्यंतच सीमित ठेवावे.'

तेव्हा ब्रह्मलोकाच्या सहम्पती ब्रह्माने भगवानांच्या मनातील हा विचार जाणला व तो चिंतित झाला. भगवानांसमोर प्रकट होऊन, त्यांच्या चरणांना नमस्कार करून, त्याने भगवानांना प्रार्थना केली - 'भन्ते भगवान ! धर्मोपदेश करावा. सुगत ! धर्मोपदेश करावा. हे सत्य आहे की जगात मिथ्यादृष्टित गुंतलेल्या, मोहाने झाकलेल्या व्यक्तींची संख्याच अधिक आहे. परंतु तरीही थोडेसे लोक तर असे आहेतच, ज्यांच्या दृष्टीवर मिथ्यावाद व मूढतेचा खूप पातळसा पडदा आहे. हा पडदा लवकरच दूर केला जाऊ शकतो. आपला हा शुद्ध निर्मल धर्म त्यांना लवकरच समजू शकतो.'

ब्रह्माद्वारे ह्या प्रकारे विनंती केल्या गेल्यावर भगवानांनी निर्णय केला की ते लोकात धर्मचक्राचे प्रवर्तन करतील. असा निश्चय करून त्यांनी सहम्पती ब्रह्माला गाथेत म्हटले - 'हे ब्रह्मा त्या लोकांसाठी अमृताचे द्वार बंद झाले आहे, जे ऐकणारे असूनही श्रद्धा नसणारे आहेत. हे ब्रह्मा, निरर्थक पीडेचा विचार करूनच मी मनुष्यांना हा उत्तम श्रेष्ठ धर्म समजवू इच्छित नव्हतो.'

सहम्पती ब्रह्माच्या प्रती भगवानांचे हे वचनही उपदेशात्मक म्हणता येत नाहीत. तरीही बुद्ध वचन तर हे होतेच.

ह्यानंतर भगवानांनी ध्यान करून पाहिले की सर्वात प्रथम कोणाला ह्या अमृत धर्माने लाभान्वित करावे. तेव्हा त्याना आपले पूर्व गुरु आलारकालामांची आठवण आली. परंतु जेव्हा बोधिनेत्रांनी पाहिले, तेव्हा जाणले की ते एका सप्ताहापूर्वीच मरण पावले आहेत. त्यानंतर त्यांना उद्दक रामपुत्तांची आठवण आली. परंतु पाहिले की तेही एक दिवस अगोदरच मरण पावले आहेत. ह्या दोन्ही व्यक्तींकडून भगवान क्रमशः सातवे व आठवे ध्यान शिकले होते. हे दोघेही ध्यान मार्गात उन्नत असूनही निर्वाण मार्गापासून दूर होते. भगवानांनी मोह-मूढतेला दूर करणारा जो शुद्ध निर्मळ मुक्तिदायक धर्म स्वतः शोधून काढला होता, त्याला ते ह्या दोन व्यक्तींना शिकवू इच्छित होते. परंतु जेव्हा पाहिले की दोघेही राहिले नाहीत, तेव्हा त्यांना कपिलवस्तूच्या पाच ब्राह्मणांची आठवण आली. ते सहा वर्षाच्या कठोर तपश्चर्येत भगवानांच्या सोबत होते, त्यांची न थकता अमूल्य सेवा केली होती, केवळ ह्या आशेने की ते एक दिवस सम्यक संबुद्ध बनतील आणि आम्हालाही ज्ञान देऊन आमचाही उद्धार करतील. परंतु शेवटच्या दिवसात ते भगवानांना सोडून अन्यत्र निघून गेले. कारण भयानक कायाकष्टालाच त्या काळी साधनेचे मापदंड मानले जात होते. त्यामुळे त्या पाच ब्राह्मण तपस्वी सोबत्यांनी जेव्हा पाहिले की राजकुमार सिद्धार्थ आपल्या कठीण उपवासाच्या व्रताला त्यागून पुन्हा भोजन करू लागला आहे, तेव्हा ते अत्यंत खिन्न व निराश होऊन त्यांची सोबत सोडून निघून गेले. भगवानांनी पाहिले की पाचही ब्राह्मण संन्यासी ह्यावेळी काशी प्रदेशातील वाराणसी नगराजवळ ऋषिपत्तन मृगदाय वनात निवास करीत आहेत. त्यामुळे त्यांना आपला धर्म समजवण्यासाठी ते काशी राज्याकडे निघाले.

जेव्हा भगवान बोधगयेपासून गयेकडे जात होते, तेव्हा रस्त्यात त्यांना उपक नावाचा एक आजीवक भेटला. तो त्या काळच्या नग्न-साधू संप्रदायाचा संन्यासी होता. त्याने पाहिले - 'भगवानांचे शरीर अत्यंत प्रभावान आहे, त्यांची इंद्रिय अत्यंत प्रसन्न व शांत आहेत. त्यांची शरीरकांती अत्यंत परिशुद्ध व उज्ज्वल आहे.' त्याला वाटले की ह्यांनी अवश्य अमृतपान केले आहे. परंतु तो संन्यासी संप्रदायवादी होता, प्रत्येक बाबीला सांप्रदायिक दृष्टिकोनाने पाहात होता. हे जाणूनही की ह्यांनी महत्वपूर्ण सिद्धी प्राप्त केली आहे, तरीही त्यांना शरण जाऊन त्यांच्याकडून धर्म शिकण्याऐवजी त्याच्या मनात हाच विचार आला की याचा गुरु कोण

आहे ? हा कोणाचा धर्म मानतो ? त्याने हेच भगवानांना विचारले. भगवानांनी सांगितले की माझा कोणीही आचार्य नाही, मी अद्वितीय आहे. देवतासहित सर्व लोकात माझ्यासारखा कोणीही नाही. मी स्वतः अरहंत सम्यक संबुद्ध झालो आहे आणि काशी राज्यात धर्मचक्र-प्रवर्तन करण्यासाठी जात आहे.

आजीवक उपकचा विश्वास बसला नाही आणि तो त्यांना सोडून निघून गेला. त्याच्या सोबतची भगवानांची चर्चाही धर्म उपदेश नव्हती. हे केवळ प्रश्नोत्तर होते.

ऋषिपत्तनात भगवानांना दुरून येतांना पाहून त्या पाच तपस्वींनी परस्पर चर्चा केली आणि निश्चय केला की हा योगभ्रष्ट श्रमण गौतम येत आहे. अशा मार्गभ्रष्टास आता आम्ही न नमस्कार केला पाहिजे, न ह्याच्या सन्मानात उभे राहिले पाहिजे, न ह्याचे पात्र, चीवर सांभाळले पाहिजेत, न अन्य कोणत्याही प्रकारे ह्याच्याप्रती सन्मान-सत्कार प्रदर्शित केला पाहिजे. हे जवळच आसन ठेवलेले आहे, इच्छा असेल तर यावर येऊन बसेल. परंतु जसजसे दहाबलशाली भगवान बुद्ध त्यांच्याजवळ येत गेले, तसतसे त्यांच्या मुखमंडलाच्या अपूर्व तेजाला पाहून, त्यांच्या बुद्ध-रश्मींनी (किरणांनी) प्रभावित होऊन, ते पाचही तपस्वी आपल्या निर्णयावर ठाम राहू शकले नाहीत. ते स्वतः भगवानांजवळ गेले. एकाने भगवानांचे पात्र, चीवर घेतले. एकाने आसन अंथरले. एकाने पाय धुण्यासाठी पाणी ठेवले. एकाने पाय धुण्यासाठी पाट समोर ठेवला व एकाने पाय घासण्याचे लाकुड त्यांना दिले. ह्या प्रकारे पाचही भगवानांच्या सेवेत लागले.

असे वाटते की खूप वेळापर्यंत त्या तपस्वींसोबत भगवानांना वादविवाद करावा लागला, तेव्हा कुठे त्यांच्या मनात ही बाब आली की खरोखर ह्यांनी सम्यक संबोधी प्राप्त केली आहे. असे होते की आम्ही नेहमी आपल्या मिथ्यादृष्टीला इतके घट्ट चिकटून राहातो की प्रत्येक बाबीला आपल्याच दृष्टिकोनाने पाहातो. ज्या बाबीची परंपरा वा रुढी पडलेली असेल, त्याच्याच सत्यावर आम्ही इतके अंधमोहित होतो की त्या वलयाबाहेर निघून न पाहू शकतो, न ऐकू शकतो, न विचार करू शकतो. ह्या पंचवर्गीय भिक्षूंच्या मनातही ही रुढिगत भावना पक्की होती की परम ज्ञान तर त्यालाच प्राप्त होते, जो अती कठोर कायाकष्टाच्या साधनेचा मार्ग ग्रहण करेल. ज्यानेही ह्या कष्ट साधनेत शिथिलता दाखवली, तो पथभ्रष्ट झाला, मग सिद्धी कसा प्राप्त करू शकेल? पंचवर्गीय संन्यासी ह्याच मिथ्या मान्यतेत गुंतलेले होते. भगवानांनी त्यांना खूप प्रयत्नाने आश्वस्त केले. तेव्हा कुठे भगवानांचा प्रथम उपदेश ऐकण्यासाठी ते तयार झाले आणि तेव्हा आजच्याच दिवशी भगवानांनी धर्मचक्राचे प्रवर्तन केले.

काय आहे हे धर्मचक्र प्रवर्तन? लोकचक्रापेक्षा काय भिन्नता आहे यात? भगवानांनी अशी कोणती नवीन बाब सांगितली ? कोणत्या नवीन तथ्याचे उद्घाटन झाले जे पूर्वी ऐकले नव्हते ? हे तर खरोखर नितांत क्रांतिकारी धर्मदर्शन होते. लोकचक्राच्या एकदम विपरित, एकदम उलट आणि म्हणून ह्याचे प्रवर्तन खूप कठीण होते. ज्या धारेत जग वाहत आहे, त्या धारेच्या अनुकूल आपल्या विचारांना प्रवाहित करणे खूप सोपे आहे. परंतु उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या भागिरथीला कोणी हाताने थांबवून दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहवण्याचा प्रयत्न करेल, तर ते काम खरोखर खूप कठीण होईल. आणि त्यापेक्षाही कठीण काम होते - धर्मचक्र प्रवर्तन करणे, ज्याची गती लोकचक्राच्या बिलकूल विपरीत दिशेत होती. एखाद्या पात्रात पाणी भरून आम्ही त्याला आपल्या हाताने जोरात उजवीकडून डावीकडे फिरवू लागलो आणि जेव्हा ते खूप जोराने फिरू लागेल तेव्हा अचानक हात बदलून त्याला डावीकडून उजवीकडे फिरवण्याचा प्रयत्न केला, तर दिसते की किती हालचाल होते, किती उपद्रव होतो. ही तर छोटीशी बाब झाली, परंतु ते खूप मोठे काम होते. जणू कोणी पूर्वेकडून पश्चिमेकडे फिरणाऱ्या पृथ्वीला अचानक थांबवून, पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरणारी बनवेल. त्या झटक्यामुळे कितीतरी रेषा तुटतील, किती पर्वत, नदी, नाले उलटे होतील, किती विस्फोट होईल, किती प्रचंड भूकंप होईल. अशाच तीव्रगतीने फिरणाऱ्या लोकचक्राला दहाबलशाली तथागताने आपल्या असीम बुद्धबळाने थांबवून विपरीत गतीत त्याचे संचालन केले, प्रवर्तन केले. हेच धर्मचक्र प्रवर्तन झाले. म्हणूनच आजच्या ह्या क्रांतिकारी दिवसाचे इतके मोठे महत्व आहे.

भगवानांनी ज्या सत्याचे उद्घाटन केले ते हे आहे की ह्या साऱ्या पीडा, जन्म-मरणाचे चक्र कुठल्या अन्य कारणामुळे नाही, तर आमच्या आपल्या चित्तधर्माच्या कारणामुळे आहेत. आम्ही आज जे काही आहोत, ते कोणाच्या कृपेमुळे अथवा शापामुळे नाही, तर आपल्याच अनंत पूर्व जन्मात केलेल्या असंख्य चांगल्या-वाईट कर्मसंस्कारांच्या प्रतिफळ स्वरूपामुळे आहोत. आणि आता आम्ही जे कर्म करीत आहोत, तेच आमच्या पुढच्या क्षणाच्या स्थितीचे कारण बनेल. म्हणून आमचे निर्माते आम्ही स्वतः आहोत.आमच्या सुख-दुःखाचे कारण आम्ही स्वतः आहोत. आमच्या बंधन-मुक्तीचे कारण आम्ही स्वतः आहोत.

ह्याच प्रकारे हे समजले की कर्मसंस्कारांचे प्रतिफळ केवळ एका जन्माचे पुरतेच होऊ शकत नाही, तर अनेक जन्मांमध्ये आमच्या सुख-दुःखाचे कारण बनते. हेही समजले की ज्या संस्कारांमुळे आमची ही स्थिती आहे, ते सर्व संस्कार अनित्य आहेत, नष्ट होणारे आहेत आणि त्या सर्व संस्कारांना दूर केले जाऊ शकते. संस्कारांना दूर करून असंस्कृत, अमर निर्वाण पदाचा ह्याच जन्मात, ह्याच शरीरात साक्षात्कार केला जाऊ शकतो, रसास्वादन केले जाऊ शकते. धर्मचक्राच्या मुळात हेच सत्य सामावले आहे. दुःख आहे तर त्या दुःखाच्या उत्पत्तीचे काही कारणही आहे आणि दुःखाच्या उत्पत्तीचे कारण आहे तर त्याचा निरोधही आहे. आणि निरोध आहे तर त्या निरोधापर्यंत पोहोचण्याचा काही मार्गही आहे. ह्या मार्गावर चालून कोणीही आपल्या संस्कारांना नष्ट करीत स्वतः आपल्या साधनेद्वारे चित्ताला शुद्ध निर्मळ करीत निर्वाणलाभी होऊ शकतो आणि हे खूप सरळ आहे. कोणी चांगला गुरू मिळाला, पूर्व जन्मांच्या पारमिता जवळ असल्या, वर्तमान काळात साधक साधना करण्याप्रती दृढ प्रयत्नवान असला, तर कोणतेही कारण नाही की तो आत्ताच, इथेच, ह्याच जन्मात समूळ दुःख निरोध करू शकणार नाही. शील, समाधी आणि प्रज्ञेचा हा अष्टांगिक मार्ग केवळ सारतत्वालाच ग्रहण करतो, निस्सार बाबींना सोडत जातो. हेच धर्मचक्र प्रवर्तन आहे. हेच आजच्या दिवसाचे महत्व आहे.

आम्हीही ह्या धर्मचक्राला आपल्या जीवनात धारण करू आणि सर्व प्रकारच्या दुःखांच्या बाहेर निघू, ह्यातच आमचे मंगल सामावले आहे.

(पुन्हा -

...धर्म शिकवणुकीच्या अनुमोदनाचे आणि साधुकाराचे आपले महत्व आहे. याचा अर्थ आहे की तुम्हाला धर्म प्रिय वाटला आणि कमीतकमी तेवढा वेळ तरी तुमची चित्तसंतती ऋजू-सरळ बनून प्रवाहित झाली. त्यामुळे धर्मानुमोदन व साधुवादाच्या ह्या पुंण्यापासून वंचित राहू नये.)

कल्याणमित्र
सत्यनारायण गोयन्का

## विश्व विपश्यना पॅगोडा परिसरात निवास सुविधा

'धम्मालय' अतिथीगृह तयार झाल्यामुळे पॅगोडा परिसरात राहणे व पॅगोड्यात ध्यान करण्यासाठी चांगली सुविधा झाली आहे. साधक व त्यांच्या परिवाराचे लोक २-३ दिवसांसाठी येथे येऊन ध्यान इत्यादी करू शकतात. अधिक माहितीसाठी संपर्क करा- श्री चैतन्य शाह, फोन- ९५९४२९२९९० तथा कार्या. ०२२-३३७४७५११. ईमेल- admin@globalpagoda.org

Registered No. NSK/271/2014-2016

## निर्माणाधीन विपश्यना केंद्र - धम्म सुधा

पश्चिमी उ.प्रदेशात स्थित मेरठ शहर (हस्तिनापुर) आस-पासच्या अनेक जिल्ह्यांशी चांगल्या महामार्गाने व रेल्वेने जोडलेले आहे. येथे पाच एकर भूमीवर धम्म सुधा विपश्यना केंद्रात ५० साधकांसाठी छोटा धम्म हॉल व निवास, आचार्य निवास तसेच अन्य आवश्यक भवन बनवण्याच्या कार्याचा आरंभ करण्यात येत आहे. संस्थानला ८० जी ची आयकर सूट उपलब्ध आहे. ह्या पुण्यकार्यात भागीदार होण्यास इच्छुक साधक/ साधीका अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क करू शकतात.

पत्ता - **'मेरठ विपश्यना संस्थान'**, ८, कमला नगर, बागपत रोड, मेरठ-२५०००२ (उ.प्र.), फोन- 2513997, 2953997, मो. 9319145240. ईमेल- vipassana.meerut@gmail.com

## ग्लोबल विपश्यना पॅगोडा, मुंबई येथे वर्ष २०१४ मध्ये पाली अभ्यासक्रम

(१) १० आक्टोंबर ते १० डिसेंबर २०१४ (निवासी ६० दिवसीय सघन पाली-इंग्रजी अभ्यासक्रम)

### आवश्यक योग्यता

ज्यांनी तीन दहा-दिवसीय व एक सतिपट्ठान शिबिर केले आहे, जे मागील एका वर्षापासून नियमित रूपाने विपश्यनेचा अभ्यास व पाच शीलांचे पालन करीत असतील- ते आवेदन करू शकतात. क्षेत्रीय आचार्यांची मंजूरी आवश्यक आहे.

**योग्यता-** आवेदक कमीत कमी १२ वी उत्तीर्ण असावा. त्याला दिवाळीच्या सुटीत एक दहा-दिवसीय विपश्यना शिबिर करणे आवश्यक आहे. **अधिक माहितीसाठी-** (१) विपश्यना विशोधन संस्थान- कार्यालय- ०२२- ३३७४७५६०, (२) श्रीमती बलजीत लांबा मो. ०९८३३५१८९७९, (३) आयुष्मती राजश्री मो. ०९००४६९८६४८, (४) डॉ.(श्रीमती) शारदा संघवी मो. ०९२२३४६२८०५.

## २०१४ मध्ये खालील प्रसंगी पूज्य माताजींच्या साम्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

**शरद पौर्णिमा** तसेच **पूज्य गुरूदेवांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, २८ सप्टेंबरला** व **गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, १८ जानेवारी २०१५ ला**, वेळ- सकाळी **११** ते दुपारी **४** वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पॅगोड्यात'.** येथे ३ वाजता गुरुदेवांच्या रेकॉर्डेड प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात. नोंदणीसाठी कृपया खालील फोन नंबरांवर वा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. कृपया नोंदणी केल्याविना येऊ नये. **समग्गानं तपोसुखो-** सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. नोंदणी **संपर्क:- फोननं.:-०२२-२८४५११७०/०२२-३३७४७५०१ -Ext.९, ०२२-३३७४७५४३/३३७४७५४४**, (**फोन नोंदणी** सकाळी **११** ते सायं **५** पर्यंत, रोज) **Online Registration: www.oneday. globalpagoda.org.**

### नव नियुक्ती

### सहायक आचार्य

१. श्रीमती नम्रता पारीख, नाशिक
2-3. Mr. Sochet Kuoch & Mrs. Somaly Chan, Cambodia.
4. Mr. Teak Sieng, Cambodia.
5. Ms. Lyna Som, Cambodia.
6. Mr. Mark Hoefer, USA
7. Mr. David & Mrs. Renee Cerchie, USA
8. Mrs. Marta Van Patten; USA
9. Mr. Steve Parks & Mrs. Elissa Brown, USA

### दोहे धर्माचे

धारण केला तर धर्म, अन्यथा फक्त बात।
सूर्य उगे प्रभात हो, अन्यथा काळ रात।।
चुपचाप करीत राहा, गहन धर्म अभ्यास।
गहन मौनातच मिळते, परम तत्व अविनाश।।
प्रतिक्षण सती जागृत हो, प्रतिक्षणी संप्रज्ञान।
प्रतिक्षणी भवमळ संपो, प्रतिक्षण होय कल्याण।।
मानव जीवन रत्नसे, व्यर्थ न दे गमवून।
पहा आंतर उदय-व्यय, मंगल जागवून।।
औषध सेवन केल्याविन, रोग मुक्त ना होय।
धर्म धारण केल्याविन, शोक मुक्त ना होय।।

### दोहे धर्माचे

पुत्र नारी धन चक्रातच, गेले जन्म अनेक।
धर्म अमर फळ मिळाले, जागे बोध विवेक।।
लोक लोक अज्ञानाचा, पसरे कसा प्रभाव।
जन्म जन्म तडफडे तरी, पुन्हा जन्माची हाव।।
जन्म मरणातून सुटण्या, कल्लोळ कसा होय?
काम क्रोधातून सुटण्या, अल्प यत्न ना होय।।
जन्म झाला तर येई, जरा मृत्यू अन् रोग।
रडून कसे संपतील, आप कर्माचे भोग।।
वारंवार जन्म होय, अंती येई काळ।
किती युगे अशी गेली, आता शुद्ध सांभाळ।।

**श्री गोयन्काजी व विपश्यनेप्रती असीम कृतज्ञतेसह**
Email: - thetriplegems@gmail.com

'विपश्यना विशोधन विन्यास' साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरि, इगतपुरी-422 403, दूरध्वनी : (02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अक्षर चित्र प्रिंटिंग प्रेस, 69- बी रोड, सातपूर, नाशिक-422 007. **बुद्धवर्ष 2558, आषाढ पौर्णिमा, 12 जुलै, 2014**

**वार्षिक शुल्क** रु. **30/-**, US $ 10, **आजीवन शुल्क** रु. **500/-**, US $ 100. **Registered No. NSK/271/2014-2016**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244076, 244086, 243712,
२४३२३८. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org